# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.10.2025** **वारःबुधवार**

---

1. सांस्कृतिक वारसा आणि लोकशाही मूल्ये, हा भारत-मंगोलिया संबंधांचा पाया असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. पंतप्रधान आज करणार बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ; पक्षाच्या बूथ कार्यकर्त्यांशीही संवाद साधणार
3. भारतातून अमेरिकेला जाणाऱ्या टपाल सेवेला आजपासून पुन्हा सुरूवात आणि
4. महाराष्ट्र राज्याचं बांबू धोरण जाहीर; 50 हजार कोटींची गुंतवणूक आणि पाच लाखांवर रोजगार निर्मितीची अपेक्षा

**राष्ट्रपती**

सामायिक सांस्कृतिक वारसा आणि लोकशाही मूल्ये ही भारत-मंगोलिया संबंधांचा पाया आहेत, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे, त्या काल राष्ट्रपती भवनात मंगोलियाच्या राष्ट्रपती खुरेलसुख उखना आणि त्यांच्या प्रतिनिधी मंडळाचे स्वागत केल्यानंतर बोलत होत्या. भारत आणि मंगोलिया हे धोरणात्मक आणि सांस्कृतिक शेजारी असून गेल्या 25 वर्षांत भारतानं मंगोलियामध्ये विविध सांस्कृतिक प्रकल्प हाती घेतले आहेत, ज्यामध्ये बौद्ध मठांचा जीर्णोद्धार आणि प्राचीन हस्तलिखितांचं पुनर्मुद्रण यांचा समावेश आहे. सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमासंबंधीचा सामंजस्य करार दोन्ही देशातील संबंध दृढ करण्यासाठी एक मजबूत पाया प्रदान करेल असा विश्वासही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केला.

**पंतप्रधान**

पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात करणार आहेत, बिहारमधील भाजपाच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांशी ते संवाद साधणार आहेत. मेरा बूथ सबसे मजबूत मोहिमेअंतर्गत पंतप्रधान मोदी पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधतील. दरम्यान बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाने काल 71 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. एनडीएचा आणखी एक मित्रपक्ष असलेल्या हिंदुस्तानी अवाम मोर्चा सेक्युलर या पक्षानेही 6 उमेदवारांची यादी जाहीर केली. दुसरीकडे, विरोधी पक्ष असलेल्या सीपीआय एम एल लिबरेशनने विधानसभा निवडणुकीसाठी 18 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. दरम्यान, महाआघाडीच्या घटक पक्षांमध्ये जागावाटपाबाबत बैठकांचं सत्र सुरू आहे, आज हे जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे.

**पंतप्रधान-आंध्रप्रदेश**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आंध्र प्रदेशला भेट देणार आहेत. या दौऱ्यात ते नंद्याल जिल्ह्यातल्या श्रीशैलम इथल्या श्री भ्रमरम्बा मल्लिकार्जुन स्वामी वरला देवस्थानम इथं पूजा करतील. ते श्रीशैलममधील श्री शिवाजी स्फूर्ती केंद्रालाही भेट देणार आहेत. तसंच पंतप्रधानांच्या हस्ते कुर्नूलमध्ये सुमारे 13 हजार 430 कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात येणार आहे. या दौऱ्यात एका जाहीर सभेला देखील पंतप्रधान मोदी संबोधित करणार आहेत.

**राजनाथसिंह**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज नवी दिल्लीत ब्राझीलचे उपाध्यक्ष गेराल्डो अल्कमिन यांची भेट घेणार आहेत. यावेळी ब्राझीलचे संरक्षण मंत्री जोसे मुसिओ मोंटेइरो फिल्हो हे देखील उपस्थित राहणार आहेत. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील

संरक्षण क्षेत्रातील बहुआयामी संबंधांचा आढावा घेतला जाईल. तसंच दोन्ही नेते लष्करी आणि संरक्षण औद्योगिक सहकार्य यासारख्या क्षेत्रांबद्दलही सविस्तर चर्चा करतील, असं संरक्षण मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**अमेरिका-टपाल**

भारतातून अमेरिकेला जाणारी टपाल सेवा आजपासून पुन्हा सुरू होत आहे. अमेरिकेच्या आयात शुल्क धोरणांच्या अंमलबजावणीनंतर या वर्षी 22 ऑगस्टपासून ही सेवा स्थगित करण्यात आली होती. नवीन रचनेनुसार भारतातून टपालाने अमेरिकेत पाठवण्याच्या पार्सलवर भारतातच शुल्क वसुली होईल. अमेरिकेत प्रवेश करताना त्यावर पुन्हा उत्पादननिहाय शुल्क आकारलं जाणार नाही. मात्र ही सुविधा फक्त केंद्र सरकारच्या टपाल विभागालाच उपलब्ध आहे. खासगी कुरियर सेवेला तिचा लाभ घेता येणार नाही.

**आयएमएफ**

अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त आयात शुल्कानंतरही चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक वृद्धी दर 6 पूर्णांक 6 दशांश टक्के राहील असा सुधारित अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं वर्तवला आहे. यापूर्वी हा दर 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहील, असं नाणेनिधीनं म्हटलं होतं. पहिल्या तिमाहीत आर्थिक वृद्धीदर मोठ्या प्रमाणात वाढल्यानं ही सुधारणा दिसून येईल.

**मंत्रिमंडळ निर्णय**

शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण 2025 ला काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार बांबू लागवड आणि प्रक्रिया क्षेत्रात सरकार 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. त्यात 5 लाखापेक्षा जास्त रोजगार निर्मिती होईल अशी अपेक्षा आहे. या अंतर्गत राज्यात 15 समर्पित बांबू क्लस्टर्स तयार करण्यात येतील तसंच कार्बन क्रेडिट बाजारपेठेचा लाभ या उद्योगाला मिळेल. शेतकऱ्यांना नगदी पिकासारखा शाश्वत आणि पर्यावरणपुरक पर्याय यामुळे मिळू शकेल. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत हे धोरण राबविले जाईल. या धोरणात बांबू शेतकरी उत्पादक संघटना, कंत्राटी शेती आणि ऊर्जा, उद्योग आणि इतर घरगुती क्षेत्रांमध्ये बांबूच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

**विरोधीपक्ष**

महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी काल राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांची भेट घेऊन त्यांना एक निवेदन सादर केलं. मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत VVPAT वापरावं, जुलै 2025 नंतर वयाची 18 वर्ष पूर्ण केलेल्यांना मतदार यादीत समाविष्ट करुन घ्यावं अशा मागण्या विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, शेकापचे जयंत पाटील, समाजवादी पक्षाचे रईस शेख यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

**निवडणूक आयुक्त**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विधानसभा मतदार मतदारसंघांच्या यादीत नव्यानं नावं समाविष्ट करणं, अथवा वगळणं किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचं महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची काल मुंबईत बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

**मुंबईमेट्रो**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशननं मुंबई मेट्रो मार्ग-तीनच्या सर्व स्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी आणि MetroConnect3 मोबाईल ॲपद्वारे डिजिटल तिकीट खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी मोफत वाय-फाय सुविधा सुरू केली आहे. ही वाय-फाय सुविधा ॲक्वा लाईनवरील सर्व स्थानकांवर उपलब्ध आहे. ही वाय-फाय सेवा मोफत, सुरक्षित आणि विश्वासार्ह आहे, यामुळे

जास्तीत जास्त नागरिकांनी तिकीट घेण्यासाठी या सुविधेचा लाभ घ्यावा, असं आवाहन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने करण्यात आलं आहे.

**उत्तर प्रदेश-उज्ज्वला योजना**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत आज राज्यातल्या महिला लाभार्थ्यांना दोन एलपीजी गॅस मोफत रिफिल देणार आहेत. यामुळं राज्यातल्या 1 कोटी 86 लाख महिलांना उत्सवाचा दिलासा मिळणार आहे. या योजनेअंतर्गत, दरवर्षी दोन मोफत एलपीजी रिफिल दोन टप्प्यात वितरित केले जाणार असून यासाठी, राज्य सरकारकडून 1500 कोटी रुपयांचे वाटप केलं जाईल. पहिल्या टप्प्यात 1 कोटी 23 लाख लाभार्थ्यांना फायदा होणार असून या योजनेची अंमलबजावणी करण्यात उत्तर प्रदेश हे आघाडीचे राज्य आहे.

**पाकिस्तान अमली पदार्थ**

पंजाब सीमेवरून भारतात अंमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी पाकिस्तानमधील तस्कर नवीन मार्ग शोधत आहेत. पंजाबमधील सीमा सुरक्षा दलाच्या उच्चपदस्थ सूत्रांनी ही माहिती दिल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे. तपासणीमधून निसटून जाता यावं यासाठी तस्करीच्या कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्याची नोंद नसलेल्या नवीन चेहऱ्यांना पाकिस्तानी तस्कर प्राधान्य देत आहेत. अमली पदार्थांची ने आण करण्यासाठी अल्पवयीन मुलांना भरती करावी जेणेकरून अटक झाल्यास त्यांना तुरुंगात टाकलं जाऊ नये, असंही पाकिस्तानी तस्कर त्यांच्या भारतातील तस्करांना सांगत आहेत.

**राजस्थान-अपघात**

राजस्थानमध्ये जैसलमेरजवळ काल एका वातानुकुलीत बसला आग लागून झालेल्या अपघातात 20 जणांचा मृत्यू झाला असून 15 प्रवासी जखमी झाले आहेत, जखमींपैकी अनेकजण 70 टक्क्यांपर्यंत गंभीर भाजले आहेत. शॉर्ट सर्किटमुळे हा अपघात झाला असावा अशी शक्यता वर्तवण्यात आली असून जखमींना उपचारासाठी जोधपूरच्या महात्मा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून केंद्र सरकारनं मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 2 लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी 50,000 रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**फुटबॉल**

गोव्यातल्या पंडित जवाहरलाल नेहरू मैदानावर झालेल्या आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशन आशियाई कप सौदी अरेबिया 2027 पात्रता फेरीच्या चौथ्या सामन्यात भारताला काल सिंगापूरकडून 1-2 असा पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळं भारतानं आघाडी गमावली आहे.

**पॅरा**

इजिप्तमधल्या कैरो इथं झालेल्या जागतिक भारोत्तोलन अजिंक्यपद 2025 मध्ये भारताच्या जॉबी मॅथ्यूने कास्यपदक जिंकलं आहे. मॅथ्यूनं 148 किलो आणि 152 किलो असं एकंदर 300 किलो वजन उचललं, दुबई 2023 मध्ये कास्यपदक मिळवल्यानंतर जॉबी मॅथ्यूचे हे दुसरे जागतिक अजिंक्यपद पदक आहे. दरम्यान थायलंडच्या फोंगसाकोन चुमचाईनं 162 किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले तर पेरूच्या नील ग्रासियानं 161 किलो वजन उचलून रौप्यपदक पटकावलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.